# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

शैक्षणिक विभाग (संलग्नता कक्ष)
गणेशखिंड, पुणे — ४११ ००७
संकेतस्थळ : www.unipune.ac.in
ई–मेल :affiliation@pun.unipune.ac.in
affiliation@unipune.ac.in

**दूरध्वनी क्रमांक :**
**(०२०) २५६२ ११९०**
**२५६२ ११९१**
**२५६२ ११९२**
**२५६२ ११९३**

**संदर्भ क्र.: सीए/** २८१

**दिनांक :** २१/२/२०२५

**अत्यंत महत्वाचे**

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

**विषय :— शैक्षणिक व विद्याविषयक तपासणीकरिता (Academic and Administrative Audit) माहिती सादर करणेबाबत..**

महोदय,

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम ११७ (२) अनुसार संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थेची शैक्षणिक व विद्याविषयक तपासणी (Academic and Administrative Audit) करण्यात येणार आहे.

विषयांकित बाबीसंदर्भातील स्वयंमूल्यमापन अहवाल ऑनलाईन पध्दतीने भरण्यासाठी दहा दिवसांचा कालावधी देण्यात येणार आहे. सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थांना BOD login मधून माहिती भरण्यासाठी लिंक उपलब्ध करून देण्यात येईल. तरी आपल्या BOD login मधील सर्व माहिती तपासून अद्ययावत करावी. (उदा.नॅक/एनबीए, प्राचार्य/संचालक, शिक्षक व शिक्षकेतर स्टाफ, भौतिक सुविधा व इतर)

महाविद्यालये/परिसंस्थांनी सादर केलेल्या माहितीची पडताळणी विद्यापीठाने गठीत केलेल्या समितीमार्फत करण्यात येईल. सदर माहितीच्या आधारे समितीने दिलेला शैक्षणिक व विद्याविषयक तपासणीचा अहवाल संबंधित महाविद्यालय/परिसंस्थेच्या BOD login मध्ये उपलब्ध करून देण्यात येईल.

याबाबतचे रितसर वेळापत्रक व इतर अनुषंगिक माहिती विद्यापीठाच्या संकेत स्थळावर (Web Site) परिपत्रकाद्वारे स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल.

कळावे,

आपला,

२१/२/२५

(गिरीश बेत)
उपकुलसचिव, संलग्नता कक्ष